विषयः नियम व नियमावली मध्ये बदल करणे. (तुलनात्मक टेबल)

अ.क्र	जूने मुद्दे	अ.क्र	नवीन मुद्दे
१)	नाव : या संस्थेचे नाव तिरवडे ग्रामविकास मंडळ मुंबई असे राहील.	१)	नाव : या संस्थेचे नाव तिरवडे ग्रामविकास मंडळ मुंबई असे राहील.
२)	**कचेरी** : या मंडळाची कचेरी पेरूची चाळ नंबर १, खोली नं. ३४, लालबाग, मुंबई १२ येथे राहील.	२)	**कचेरी : या मंडळाची कचेरी २१, चरणजीत निवास, जयदेव सिंह नगर, एस् पी. एस्. रोड, भांडुप (प), मुंबइ** ४०० ०७८
३)	उद्देश : (अ) तिरवडे येथील मुंबई निवासी व्यक्तीची संघटना करुन तद्द्वारे परस्पर ऐक्य व स्नेह संवर्धन करणे. (ब) तिरवडे येथील रहिवाशांची शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक आदी बाबतीत उन्नत्ती व्हावी म्हणून प्रयत्न करणे. (क) उपरोक्त गावांची अगर कोकणाची उन्नत्ती करण्याचे कामी इतर संस्थांशी अगर संस्था संघाशी सहकार्य करणे अगर सलग्न होणे.	३)	उदेश : (अ) तिरवडे येथील मुंबई निवासी व इतर ठिकणी वास्तव्यास असलेल्या व्यक्तींची संघटना करुन तद्द्वारे परस्पर ऐक्य व स्नेह संवर्धन करणे. (ब) तिरवडे येथील रहिवाशांची शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आदी बाबतीत उन्नत्ती व्हावी म्हणून प्रयत्न करणे. (क) तिरवडे येथील रहिवाशांची शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आदी बाबतीत उन्नत्ती व्हावी म्हणून प्रयत्न करणे.
४)	व्यावसायिक वर्ष : या मंडळाचे व्यवसायिक वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असे गणण्यात येईल.	४)	व्यावसायिक वर्ष : या मंडळाचे व्यावसायिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे गणण्यात येईल.
५)	सभासदत्व : नोकरी धंद्यानिमीत्त मुंबईत वास्तव्य करून असलेल्या कोणाही १८ वर्षावरील तिरवडे ग्रामस्थ व्यक्तीस या मंडळामध्ये सभासद होता येईल.	५)	सभासदत्व : नोकरी धंद्यानिमीत्त मुंबईत व इतर ठिकणी वास्तव्य करून असलेल्या कोणत्याही १८ वर्षावरील तिरवडे ग्रामस्थ व्यक्तीस या मंडळामध्ये सभासद होता येईल.
६)	सभासद होण्याची रीत : कलम क्रमांक ५ मधील अटी पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस सभासदत्वाचा छापील अर्ज भरुन इच्छित वर्गाची वर्गणी व १ रुपये प्रवेश फी यासह मंडळाच्या चिटणीसाकडे दिल्यावर कार्यकारी मंडळाच्या मंजूरी नंतर अर्जदार व्यक्तीस सभासदत्व मिळेल. कोणाचा अर्ज नामंजूर झाल्यास कारणे न देता तसे अर्जदार व्यक्तीस कळविण्यात येईल व वर्गणी परत केली जाईल.	६)	सभासद होण्याची रीत : कलम क्रमांक ५ मधील अटी पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस सभासदत्वाचा छापील अर्ज भरुन मासीक वर्गणी व १० रुपये प्रवेश फी यासह मंडळाच्या चिटणीसाकडे दिल्यावर कार्यकारी मंडळाच्या मंजूरी नंतर अर्जदार व्यक्तीस सभासदत्व मिळेल. तसेच वयाच्या ६० वर्षानंतर ज्या सभासदाना स्वखुशीने आजीवन सभासद व्हायचे असेल तर होता येईल. कोणाचा अर्ज नामंजूर झाल्यास कारणे न देता तसे अर्जदार व्यक्तीस कळविण्यात येईल व वर्गणी परत केली जाईल.
७)	सभासदांचे वर्ग : सभासदांचे वर्ग पुढील प्रमाणे राहतील.	७)	सभासदांचे वर्ग : सभासदांचे वर्ग पुढील प्रमाणे राहतील.

	तहयांत सभासद : अ) पुरस्कर्ते : रुपये १०१ अगर त्याहून जास्त रक्कम किंवा एका वर्षात देणारे ब) आश्रयदाते : रुपये ७५ अगर त्याहून जास्त रक्कम किंवा एका वर्षात देणारे क) आजीव सभासद : एकदम रुपये ५१ अगर त्याहून जास्त रक्कम आगाऊ किंवा एका वर्षात देणारे. सर्वसामान्या सभासद : (अ) दर महा ०–८–० (ब) दर महा ०–५–० देणारे टीप: कोणत्याही सभासदास वरचा वर्गाचे सभासद होणे असल्यास लेखी कळविल्यावर आवश्यकती वर्गणी भरून इच्छित वर्ग स्वीकारता येईल.		१) सर्वसामान्या सभासद : दरमहा ३० रुपये देणारे. (आवश्यकतेनुसार/परिस्थिती नुसार सर्व साधारण सभेत वर्गणी वाढविण्यात येऊ शकते) २) आजीव सभासद : एकदम रुपये १०००/– अगर त्याहून जास्त रक्कम देणारे.
८)	देणगीदार व हितचिंतक : अ) देणगीदार : मंडळाच्या कार्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या व्यक्तीकडून देणग्यांचा साभार स्विकार करण्यात येईल. ब) हितचिंतक : रु. १०१ पेक्षा अधिक रक्कम मंडळाला देणगी दाखल देणाऱ्या व्यक्तीस हितचिंतक समजण्यात येईल व अशा हितचिंतकांची नावे मंडळाच्या प्रत्येक वार्षीक अहवालात नमूद करण्यात येतील. शिवाय विशिष्ट कामासाठी आलेल्या देणग्यांचा विनीयोग त्याच कामासाठी करण्यात येईल.	८)	देणगीदार व हितचिंतक : अ) देणगीदार : मंडळाच्या कार्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या व्यक्तीकडून देणग्यांचा साभार स्विकार करण्यात येईल. ब) हितचिंतक : रु. १०१ पेक्षा अधिक रक्कम मंडळाला देणगीदाखल देणाऱ्या व्यक्तीस हितचिंतक समजण्यात येईल. शिवाय विशिष्ट कामासाठी आलेल्या देणग्यांचा विनीयोग त्याच कामासाठी करण्यात येईल.
९)	मताधिकार : मंडळाच्या सर्व सभासदाना हितचिंतकखेरीज समान अधिकार राहील. मात्र ज्यांची पूर्ण वर्गणी जमा झालेली नाही अशा सभासदाना मत देण्याचा, निवडण्याचा अगर निवडून येण्याचा अधिकार राहाणार नाही.	९)	मताधिकार : मंडळाच्या सर्व सभासदाना समान अधिकार राहील. मात्र ज्यांची पूर्ण वर्गणी जमा झालेली नाही अशा सभासदाना मत देण्याचा, किंवा निवडून येण्याचा अधिकार राहाणार नाही. तसेच आजीवन सभासदाना मत देण्याचा, किंवा निवडून येण्याचा अधिकार राहाणार नाही
१०)	मत निर्णय : (अ) प्रत्येक बाबी विषयी बहूमताने निर्णय घेण्यात येईल. (ब) कोणत्याही बाबी विषयी समान मत विभागणी झाल्यास अध्यक्षांचे मत निणायक समजण्यात येईल.	१०)	मत निर्णय : (अ) प्रत्येक बाबी विषयी बहूमताने निर्णय घेण्यात येईल. (ब) कोणत्याही बाबी विषयी समान मत विभागणी झाल्यास अध्यक्षांचे मत निर्णायक समजण्यात येईल.

११)	कार्य मर्यादाः व्यक्तीगत अगर राजकीय बाबीपासून मंडळ अलिप्त राहील. मंडळाशी निगडीत व पोषकप्रश्नांचा विचार केला जाईल.	११)	कार्य मर्यादा : व्यक्तीगत अगर राजकीय बाबीपासून मंडळ अलिप्त राहील. मंडळाशी निगडीत व पोषक प्रश्नांचा विचार केला जाईल.
१२	कार्यकारी मंडळः मंडळाचा उद्देश पार पाडण्यासाठी एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक चिटणीस, एक सहचिटणीस व एक खजिनदार असे पाच पदाधिकारी आणि आठ सभासद मिळून १३ सभासदांचे मंडळ सर्वसाधारण सभेत निवडण्यात येईल.	१२)	कार्यकारी मंडळः मंडळाचा उद्देश पार पाडण्यासाठी एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक चिटणीस, एक सहचिटणीस व एक खजिनदार असे ५ पदाधिकारी आणि १० सभासद असे एकूण १५ सभासदांचे कार्यकारी मंडळ दर तीन वर्षांनी सर्वसाधारण सभेत निवडण्यात येईल. जर कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संख्या कमी किंवा जास्त करायची असल्यास सर्वसाधारण किंवा विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या १/३ मताधिक्याने निर्णय घेऊन करता येईल.
१३)	पदाधिकाऱ्यांची कामेः १) <u>अध्यक्ष</u> : मंडळाच्या व कार्यकारी मंडळाच्या सभांचे अध्यक्षस्थान स्विकारणे व कार्यकारी मंडळाच्या कामावर देखरेख ठेवणे २) <u>उपाध्यक्षः</u> अध्यक्षांच्या अनूपस्थित त्यांची कामे करणे. ३) <u>चिटणीस</u> : (अ) मंडळाच्या व कार्यकारी मंडळाच्या सभा भरविणे (ब) सभांचे इतिवृत्त नमूद करणे (क) मंडळाच्या वतीने पत्रव्यवहार करणे (ड) मंजूर झालेल्या ठरावांची अंमलबजावनी करणे. (इ) मंडळाच्या कागदा पत्राची जतन करणे (ई) तातडीच्या कामासाठी एकावेळी रुपये १० पर्यंत खर्च करुन त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजुरी घेणे. ४) <u>सहचिटणीस</u> : चिटणीसास त्याच्या कामात मदत करुन त्याच्या गरै हजरीत त्यांची सर्व कामे करणे. ५) <u>खजिनदार</u> : सभासदांची वर्गणी व देणग्यानमूद करुन घेणे तसेच जमाखर्च लिहीणे.	१३)	पदाधिकाऱ्यांची कामेः १) <u>अध्यक्ष</u> : मंडळाच्या व कार्यकारी मंडळाच्या सभांचे अध्यक्षस्थान स्विकारणे व कार्यकारी मंडळाच्या कामावर देखरेख ठेवणे २) <u>उपाध्यक्षः</u> अध्यक्षांच्या अनूपस्थित त्यांची कामे करणे. ३) <u>चिटणीस</u> : (अ) मंडळाच्या व कार्यकारी मंडळाच्या सभा भरविणे (ब) सभांचे इतिवृत्त नमूद करणे (क) मंडळाच्या वतीने पत्रव्यवहार करणे (ड) मंजूर झालेल्या ठरावांची अंमलबजावनी करणे. (इ) मंडळाच्या कागदा पत्राची जतन करणे (ई) तातडीच्या कामासाठी एकावेळी रुपये ५०००/– पर्यंत खर्च करुन त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजुरी घेणे. ४) <u>सहचिटणीस</u> : चिटणीसास त्याच्या कामात मदत करुन त्याच्या गैर हजरीत त्यांची सर्व कामे करणे. ५) <u>खजिनदार</u> : सभासदांची वर्गणी व देणग्यानमूद करुन घेणे तसेच जमाखर्च लिहीणे. ६) <u>सभा भरविणे अशक्य झाल्यास</u> : अध्यक्ष, चिटणीस व खजिनदार हे एक मताने एखादे तातडीचे काम करु शक्तील मात्र त्यानंतर

	६) <u>सभा भरविणे अशक्य झाल्यास</u> : अध्यक्ष, चिटणीस व खजिनदार हे एक मताने एखादे तातडीचे काम करु शकतील मात्र त्यानंतर भरणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या सभेत त्याकरिता मंजूरी घेतली पाहिजे. टिप: अध्यक्ष व उपाध्यक्ष अनूपस्थित असल्यास त्या सभेच्या अध्यक्षपदी पदाधिकारी व्यतीरीक्त एक सभासदाची निवड करण्याचा अधिकार हा सभेस राहील.		भरणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या सभेत त्याकरिता मंजूरी घेतली पाहिजे. टिप: अध्यक्ष व उपाध्यक्ष अनूपस्थित असल्यास त्या सभेच्या अध्यक्षपदी पदाधिकारी व्यतीरीक्त एक सभासदाची निवड करण्याचा अधिकार हा सभेस राहील.
१४)	वार्षीक साधारण सभा : (अ) मंडळाची साधारण सभा वर्ष अखेरी नंतर तीन महिन्याचे आत भरेल, त्या सभेची सूचना सात दिवस आगाऊ देण्यात यईल अशा सभेची गणसंख्या पटावरील सभासदांच्या १/३ अगर २० यापैकी कमी असलेली राहील. (ब) साधारण सभेची कामे : १) जमाखर्चासह वार्षीक अहवाल मंजूर करणे २) कार्यकारी मंडळाची निवड करणे ३) हिशेब तपासनिस निवडणे ४) कायकारी मंडळाच्या मार्गदर्शना साठी सूचना अगर ठराव करणे वगैरे.	१४)	वार्षीक साधारण सभा : (अ) मंडळाची साधारण सभा वर्ष अखेरी नंतर सहा महिन्याचे आत भरेल, त्या सभेची सूचना सात दिवस आगाऊ देण्यात यईल अशा सभेची गणसंख्या पटावरील सभासदांच्या १/३ अगर २० यापैकी कमी असलेली राहील. (ब) साधारण सभेची कामे : १) जमाखर्चासह वार्षीक अहवाल मंजूर करणे २) कार्यकारी मंडळाची निवड करणे ३) हिशोब तपासनिस निवडणे ४) कार्यकारी मंडळाच्या मार्ग दर्शनासाठी सूचना अगर ठराव करणे वगैरे
१५	असाधारण सभा : कार्यकारी मंडळास इष्ट वाटल्यास अगर २० हून अधिक सभासदांची लेखी मागणी केल्यास असाधारण सभा भरविण्यात येईल. सभेची सूचना गणसंख्या वगैर साधारण सभेचे नियम लागू पडतील.	१५)	असाधारण सभा : कार्यकारी मंडळास इष्ट वाटल्यास अगर २० हून अधिक सभासदांची लेखी मागणी केल्यास असाधारण सभा भरविण्यात येईल. सभेची सूचना गणसंख्या वगैर साधारण सभेचे नियम लागू पडतील.
१६)	कार्यकारी मंडळाची सभा : १) कार्यकारी मंडळाची सभा २ महिन्यातून एकदातरी भरविण्यात येईल. २) या सभेची सूचना चार दिवस आगाऊ देण्यात यईल. ३) या सभेची गणसंख्या सात राहील.	१६)	कार्यकारी मंडळाची सभा : १) कार्यकारी मंडळाची सभा २ महिन्यातून एकदा तरी भरविण्यात येईल. २) या सभेची सूचना चार दिवस आगाऊ देण्यात यईल. ३) या सभेची गणसंख्या सात राहील.
१७)	हिशेब तपासनीस : मंडळाच्या प्रत्येक साधारण सभेत पुढील वर्षाकरीता एक हिशेब तपासनीसाची निवड करण्यात येईल. वर्षअखेर मंडळाचा हिशेब तपासून अभिप्राय देणे हे काम राहील.	१७)	हिशोब तपासनीस : मंडळाच्या प्रत्येक साधारण सभेत पुढील वर्षाकरीता एक हिशोब तपासनीसाची निवड करण्यात येईल. वर्षअखेर मंडळाचा हिशेब तपासून अभिप्राय देणे हे काम राहील.
१८)	निधी आणि विनियोग : वर्गणी, देणगी व अन्य रुपानी जमा झालेल्या रक्कमेपैकी चिटणीस व	१८)	निधी आणि विनियोग : वर्गणी, देणगी व अन्य रुपानी जमा झालेल्या रक्कमेपैकी चिटणीस व खजिनदार हे

	खजिनदार हे प्रत्येकी २५ व ४० रुपये रक्कम आपल्याजवळ ठेवून बाकीची रक्कम कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या बँकेमध्ये मंडळाच्या नावे जमा करतील व निधीतून मंडळाची संकल्पीत कामे करण्यात येतील.		प्रत्येकी २०००/– रुपये रक्कम आपल्याजवळ ठेवून बाकीची रक्कम कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या बँकेमध्ये मंडळाच्या नावे जमा करतील व निधीतून मंडळाची संकल्पीत कामे करण्यात येतील.
१९)	वार्षिक सभा : समारंभाचे अध्यक्ष वार्षिक सभा अगर समारंभाच्या अध्यक्षपदी मंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेरील व्यक्तीची निवड करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.	१९)	वार्षिक सभा : समारंभाचे अध्यक्ष वार्षिक सभा अगर समारंभाच्या अध्यक्षपदी मंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेरील व्यक्तीची निवड करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.
२०)	समित्या : कार्यकारी मंडळाच्या अगर साधारण सभेत आवश्यकतेनूसार समित्या अगर उपसमित्या निवडण्यात येतील.	२०)	समित्या : कार्यकारी मंडळाच्या अगर साधारण सभेत आवश्यकतेनूसार समित्या अगर उपसमित्या निवडण्यात येतील.
२१)	जागा रिकामी झाल्यास व्यवस्था : पदाधिकाऱ्यासह कार्यकारी मंडळाच्या सभासदापैकी कोणाचीही जागा रिकामी, राजीनाम्यामुळे, सबळ कारण न देता सतत तीन सभेस अनुपस्थित राहिल्यास अगर अन्य कारणामुळे रिकामी झाल्यास ती जागा सभासद स्विकृत करुन कार्यकारी मंडळाने भरली पाहिजे.	२१)	जागा रिकामी झाल्यास व्यवस्थाः पदाधिकाऱ्यासह कार्यकारी मंडळाच्या सभासदापैकी कोणाचीही जागा रिकामी, राजीनाम्यामुळे, सबळ कारण न देता सतत तीन सभेस अनुपस्थित राहिल्यास अगर अन्य कारणामुळे रिकामी झाल्यास ती जागा सभासद स्विकृत करुन कार्यकारी मंडळाने भरली पाहिजे.
२२)	पोटनियम : या संघटनेत ग्रंथीत केलेल्या नियमांशी विसंगत नाहीत असे पोटनियम करण्याचा अधिकार मंडळाच्या सर्व साधारण सभेला राहील.	२२)	पोटनियम : या संघटनेत ग्रंथीत केलेल्या नियमांशी विसंगत नाहीत असे पोटनियम करण्याचा अधिकार मंडळाच्या सर्व साधारण सभेला राहील
२३)	नियमात दुरुस्त्या : या संघटनेमध्ये कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करावयाची असल्यास याच कामासाठी भरविलेल्या खास असाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या १/३ मताधिक्याने करता येईल.	२३)	नियमात दुरुस्त्याः या संघटनेमध्ये कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करावयाची असल्यास याच कामासाठी भरविलेल्या खास असाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या २/३ मताधिक्याने करता येईल.
२४)	सभासदांचे अधिकार व मर्यादा : (अ) मंडळाचे दप्तर हिशेबाच्या वह्या व पत्रव्यवहार वगैरे पाहण्याचा अधिकार प्रत्येक सभासदास राहील मात्र त्याने अगाऊ पंधरा दिवसांची लेखी सूचना चिटणीसाकडे दिल्यास कार्यकारी मंडळाच्या संम्मत्तीने दाखविण्यात येईल.	२४)	सभासदांचे अधिकार व मर्यादा : (अ) मंडळाचे दप्तर हिशेबाच्या वह्या व पत्रव्यवहार वगैरे पाहण्याचा अधिकार प्रत्येक सभासदास राहील मात्र त्याने अगाऊ पंधरा दिवसांची लेखी सूचना चिटणीसाकडे दिल्यास कार्यकारी मंडळाच्या संम्मत्तीने दाखविण्यात येईल.

	(ब) एखाद्या सभासदांकडे दहा महिन्याची वर्गणी थकबाकी राहिल्यास ती भरण्या बद्दल त्यास लेखी सूचना देऊनही एकमहिन्याच्या आत न भरल्यास त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील तसेच मंडळाच्या कार्याला विघातकअसे वर्तन घडल्यास सभासदाचे सभासदत्व कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार उपस्थित सभासदांच्या २/३ मताधिक्याने रद्द करण्याचा अधिकार साधारण सभेस राहील.		(ब) एखाद्या सभासदांकडे दहा महिन्याची वर्गणी थकबाकी राहिल्यास ती भरण्या बद्दल त्यास लेखी सूचना देऊनही एक महिन्याच्या आत न भरल्यास त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील तसेच मंडळाच्या कार्याला विघातक असे वर्तन घडल्यास सभासदाचे सभासदत्व कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार उपस्थित सभासदांच्या २/३ मताधिक्याने रद्द करण्याचा अधिकार सर्वसाधारण किंवा असाधारण सभेस राहील.
२५)	मंडळ चालविण्यास अश्यक्य झाल्यास व्यवस्था : मंडळाचे काम चालविणे अश्यक्य झाल्यास १४ दिवसांचे आत आगाऊ सचना देऊन भरविलेल्या खास असाधारण अगर साधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/४ मताधिक्याने मंडळाचे विसर्ज न करता येईल अशा तऱ्हेने विसर्जन केलेल्या मंडळाची मालमत्ता आणि संस्थेचे देणे असल्यास ते विभागून समान उद्दिदष्टे असणाऱ्या सर्वजनिक संस्थेला अगर संस्थाना देणगी म्हणून देण्यात यईल अगर ती सभा ठराव करुन ठरविल त्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यात येईल.	२५)	मंडळ चालविण्यास अश्यक्य झाल्यास व्यवस्था : मंडळाचे काम चालविणे अश्यक्य झाल्यास १४ दिवसांचे आत आगाऊ सूचना देऊन भरविलेल्या खास असाधारण अगर साधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३ /४ मताधिक्याने मंडळाचे विसर्जन करता येईल अशा तऱ्हेने विसर्जन केलेल्या मंडळाची मालमत्ता आणि संस्थेचे देणे असल्यास ते भागवून तिरवडे गावच्या "विकास समिती तिरवडे" ला देणगी म्हणून देण्यात येईल किंवा ती सभा जसा ठराव करुन ठरविल त्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यात येईल.
		२६)	मंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ घेण्यासाठी जर शासनाचे परवाने, किंवा इतर काही दाखले, दस्तऐवज घ्यावे लागले तर सर्व साधारण किंवा विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या १/३ मताधिक्याने निर्णय घेऊन सदर परवाने, दाखले, दस्तऐवज बनवता येतील.

"तिरवडे ग्राम विकास मंडळ, मुंबई"

मुंबई नोंदणी क्रमांक ई-१२१२

प्रति,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त

बृहन्मुंबई विभाग मुंबई .

महोदय ,

सभासदांची/ विश्वस्थाची यादी

सभासदांचे नाव	पद
श्री लक्ष्मण दामोधर गावडे	अध्यक्ष
श्री बापू नामदेव गावडे	उपाध्यक्ष
श्री आबाजी तुकाराम गावडे	सेक्रेटरी
श्री गणेश आप्पा गावडे	उप सेक्रेटरी
श्री राजेंद्र वसंत गावडे	खजिनदार
श्री शंकर गोविंद सावंत	सभासद
श्री राजेश रमेश गावडे	सभासद
श्री झिलू बळीराम परब	सभासद
श्री हेमंत बाळकृष्ण गावडे	सभासद
श्री विनायक नामदेव गावडे	सभासद
श्री प्रविण जनार्दन गावडे	सभासद
श्री तुळशीदास मोहन मेस्त्री	सभासद
श्री सुनील नारायण गावडे	सभासद